आधुनिक विचारांचे
# वर्तमान



## अर्थसंकल्पीय अधिवेशनास प्रारंभ

मुंबई : महाराष्ट्राचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवारपासून सुरु झाले आहे. राज्याचा अर्थसंकल्प ८ मार्चला मांडला जाईल तर १० मार्चला अधिवेशनाची सांगता होईल. शेतकरी आंदोलन, मराठा आरक्षण, वाढीव वीज बिल, संजय राठोड प्रकरण, विविध दरवाढ (पेट्रोल–डिझेल, गॅस) या मुद्द्यांनी अधिवेशन गाजणार असल्याचे बोलले जात आहे. ८ मार्च रोजी अर्थसंकल्प सादर होणार आहे. १० मार्च रोजी अर्थसंकल्पावर चर्चा होवून अधिवेशनाची सांगता होणार आहे.

बीड । मंगळवार, २ मार्च २०२१ । वर्ष : ३ आपले वृत्तपत्र, आपला आवाज अंक : १९ । पाने : ४ । मूल्य २ ₹

'सौ दाऊद एक राऊत' कार्यक्रमात
### संजय राऊत यांचे खडेबोल

## देशात विरोधकांना संपवण्याचे षडयंत्र

▶ प्रतिनिधी

औरंगाबाद : गेल्या सात वर्षात विरोधी विचाराच्या व्यक्तीला संपवण्याचे घातक राजकारण देशात आकाराला आले आहे. संस्था आणि व्यक्तीस्वातंत्र्य संपवण्याचे षडयंत्र दिसत आहे. देशातील जनता शांत दिसत असली तरी आतून खदखद वाढली आहे. २०२४ मध्ये शांततेचा स्फोट झालेला दिसेल. सद्दाम हुसेन, हिटलर, डोनाल्ड ट्रम्प असे कुणीच नेते सत्तेचा अमरपट्टा बांधून आले नव्हते. नेत्याच्या वर्तनातून दंभ दिसतो तेव्हा इतिहास बदलतो, अशी टीका खासदार संजय राऊत यांनी प्रकट मुलाखतीत केली.

भीमशक्ती विचार मंच आणि माजी नगरसेवक चेतन कांबळे यांच्या वतीने आयोजित जय भीम फेस्टिव्हल'मध्ये खासदार संजय राऊत यांची राजू परुळेकर यांनी प्रकट मुलाखत घेतली. हॉटेल अजंठा ॲम्बेसेडर येथे रविवारी सायंकाळी मुलाखत पार पडली. देशातील राजकीय घडामोडींवर राऊत यांनी सडेतोड उत्तरे दिली.

देशात भाजप सरकार विरोधाचा सूर ठेवायचा नाही म्हणून विरोधकांचे प्रतिमाहनन करीत आहे. त्यासाठी सरकारी यंत्रणेचा वापर सुरू आहे. देश विरोधकमुक्त करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. पंतप्रधान, नेते येतात आणि जातात. मात्र, एकदा



घडी विस्कटली तर देश टिकणार नाही. सध्या दिल्लीतील संसद मूक आणि बधीर झाली आहे. भाजपचे खासदार इतर पक्षाच्या खासदारांशी मोकळे बोलत नाहीत आणि हसत नाहीत. एवढा धाक संसदेत कधीच बघितला नव्हता. भाजप बहुमतात असूनही खासदारांना बोलण्याचे स्वातंत्र्य नाही', अशी टीका राऊत यांनी केली.गुजरातचे माजी खासदार मोहन डेलकर यांनी मुंबईत आत्महत्या केली. त्यांनी लिहिलेल्या चिठ्ठीत भाजपच्या नेत्यांची नावे आहेत. गुजरातमध्ये आत्महत्या केली तर कधीच चौकशी होणार नाही याची त्यांना कल्पना असल्याने मुंबईत आत्महत्या केली असावी. महाविकास आघाडी सरकार त्यांच्या मृत्यूची चौकशी करणार आहे, असे राऊत यांनी सांगितले.

### राज्यपाल दिल्लीचे हस्तक

मंत्रिमंडळाने बारा सदस्यांची नावे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्याकडे आठ महिन्यांपूर्वी दिली आहेत. नावांना मंजुरी देणे बंधनकारक आहे. संघ प्रचारक असलेल्या कोश्यारी यांना आपल्या विचाराचे सरकार राज्यात यावे, असे वाटते. हे सरळसरळ घटनेचे उल्लंघन आहे. यापूर्वी पहाटे शपथ देऊन त्यांनी घटनेचे उल्लंघन केले होते. पण, असे काळोखात चोरलेले विचार टिकत नसतात. राज्यपाल दिल्लीचे एजंट असतात. आता राजभवनाचे अध:पतन झाले आहे, अशी टीका राऊत यांनी केली.

## फास्टट्रॅकन्यूज

### भाजपकडून गलिच्छ राजकारण : उध्दव ठाकरे



मुंबई : संजय राठोड यांच्या राजीनाम्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. भाजपकडून राज्यात गलिच्छ राजकारण सुरु असल्याचा पलटवार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भाजपवर केला आहे. कोरोना काळात भ्रष्टाचाराचा आरोप खोटा आहे. एकीकडे राज्यातील कोरोना योद्ध्यांचा सत्कार करायचा आणि दुसरीकडे भ्रष्टाचाराचे आरोप करायचे, असे दुतोंडी विरोधी पक्ष असल्याचा टोला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी लगावला.

### जिल्ह्यातील व्यापाऱ्यांची होणार अँटीजन टेस्ट


बीड : जिल्ह्यातील वाढता कोरोना संसर्ग रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापारी, छोटे दुकानदार, भाजीपाला विक्रेते यांची अँटीजन टेस्ट करण्याचा निर्णय घेतला. चार दिवसानंतर याला सुरुवात केली जाणार आहे. अँटीजन न केल्यास कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. बीड जिल्ह्यातील व्यापाऱ्यांना शासनाने कोरोना लस द्यावी अशी मागणी व्यापारी संघटनेने जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन केली. त्यावेळी झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांनी व्यापाऱ्यांनी अँटीजन टेस्ट करून घ्यावी असे सांगितले. येत्या दोन चार दिवसानंतर आठवडा भरात वेगवेगळ्या भागात अँटीजन करण्याचे नियोजन केले जाईल.जे व्यापारी टेस्ट करणार नाहीत त्यांना दुकान सुरू करता येणार नाही तसेच कारवाईला सामोरे जावे लागेल अस प्रशासनाने ठामपणे सांगितले आहे.

### मोहखेड येथे १० एकर जंगल जळून खाक

धारूर : तालुक्यातील मोहखेड येथे धारूर वनविभागाचे मोठ्या प्रमाणात जंगल आहे. या जंगलास रविवारी दुपारी साडे तीन वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. या आगीत अंदाजे जवळपास दहा वन जंगल जळून खाक झाल्याचे समजते.

या बाबत ग्रामस्थांना याची माहिती मिळताच ग्रामस्थांच्या मदती दीड तासानंतर ही आटोक्यात आणण्यात यश मिळाले. तो पर्यत जंगलातील नवसंपदा जळुन खाक झाली होती. ही आग कशामुळे लागली हे अद्यापही स्पष्ट झाले नाही. त्यातच ही आग विझवण्याचा प्रयत्न करणाऱ्याचे कपडेही जळाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. सध्या तर उन्हाळा चालु ही झाला नाही तरी ही आग कशी लागली.वनवा झाला की इतर कांही असे अनेक तर्क वितर्क नागरिक काढत आहेत. विशेष म्हणजे आगीच्या घटनेनंतर एकही वन अधिकारी पोहचला नसल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.





## वाळुमाफियांचा 'रात्रीस खेळ चाले'

### सिंदफणा, गोदावरीत जेसीबींचे जाळे;महसूल,पोलिस यंत्रणेचे अर्थपूर्ण दुर्लक्ष

▶ भगीरथ तोडकरी

माजलगाव : तालुक्यातील सिंदफणा, गोदावरी नदीपात्रात वाळुमाफियांनी अक्षरशः धुमाकूळ घातल्याने नदीपात्रालगतचे ग्रामस्थ हैराण झाले आहेत. दरम्यान, रात्रीस चालणारा हा खेळ कधी थांबवला जाईल असा जनसामान्यांना पडला आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षमुळे वाळुमाफियांचे फावते आहे, अशी माहिती ग्रामस्थांनी दिली.

गोदावरी, सिंदफणा नदीपात्रातून जेसीबीच्या सह्याने अवैध वाळू उपसा वाळुमाफिया करत आहेत. या भागात त्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. या वाळू माफियांना महसूल आणि ग्रामीण पोलीस अधिकारी यांना अभय देत आहेत. त्यामुळे गोदावरी, सिंदफणा नदीकाठावरील ग्रामस्थ या वाळूमाफियांना वैतागले आहेत. वरिष्ठ अधिकारी या विरोधात काय कारवाई करतात का याकडे आता यांचे लक्ष लागले आहे.माजलगाव तालुक्यातील गोदावरी नदी काठावरील काळेगाव हिवरा, रिधोरी, सादोळा, मोगरा, डिग्रस गव्हाणथडी, गंगामसला, बोरगाव आणि सिंदफणानदी काठावरील माजलगाव गोविंदपूर नागडगाव चिंचोली आधी गावातील नदीपात्रातून जेसीबीच्या साह्याने रात्री–बेरात्री व सर्रास वाळू उपसा करून दिवसा ढवळ्या चढ्या भावाने सर्रास विकली जात आहे. या सर्व वाळुमाफियांच्या या दोषाला गोदावरी आणि सिंदफणा नदी काठावरील ग्रामस्थ वैतागले आहेत. अनेक ग्रामस्थांनी महसूल आणि पोलिस अधिकाऱ्यांना भ्रमणध्वनीवरून माहिती दिलेली आहे परंतु त्यांनी फोन उचलले नाहीत अशा तक्रारी अनेक ग्रामस्थांनी केले आहेत. त्याच बरोबर या वाळू माफियांच्या रात्रीबेरात्री कशामुळे अनेकांच्या शेतीचे नुकसान रस्त्याचे नुकसान होऊ लागले आहेत. या वाळुमाफियांना तालुक्यातील महसूल आणि पोलिस अधिकारी, कर्मचारी हे सर्व अभय देत आहेत. या मंडळीच्या कृपाशीर्वादाने या मंडळीचा तालुक्यात धुमाकूळ सुरु आहे आता वरिष्ट अधिकाऱ्यांनीच या वाळुमाफियांना आवर घालावी अशी मागणी होत आहे.

## शुभवर्तमान! सफाई कामगारांच्या पाल्यांची शिष्यवृत्ती झाली दुप्पट

▶ प्रतिनिधी

मुंबई : राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी सफाई कामगार व आरोग्यास धोका असणाऱ्या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या मुलांना 'गुड न्यूज' दिली आहे. सरकारच्या मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेत आता बदल करण्यात आले असून विद्यार्थ्यांना दर महिन्याला दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रकमेत दुप्पट वाढ करण्यात आली आहे.



मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेच्या लाभात काही भरीव बदल करण्यात आले असून, याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयानुसार पहिली व दुसरीतील विद्यार्थ्यांना पूर्वी प्रतिमहिना ११० रुपये शिष्यवृत्ती मिळत असे ती वाढवुन आता प्रतिमहिना २२५ रुपये करण्यात आली आहे. तिसरी ते दहावीतील विद्यार्थ्यांना महिना ११० रुपये मिळत असे, तेही वाढवून आता २२५ रुपये करण्यात आले आहे. तर वर्षाला मिळणारे एकत्रित मानधन हे पूर्वीप्रमाणे रुपये ७५० इतकेच असणार आहे. विद्यार्थ्यांना पूर्वी वर्षाला १८६० रुपये मिळत, नवीन नियमानुसार झालेल्या वाढीनंतर वर्षाला एकूण ३००० रुपये मिळणार असल्याचे मंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितले.

वसतिगृहात राहणाऱ्या तिसरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना वार्षिक ७०० रुपये व वार्षिक अनुदान १००० रुपये या पूर्ववत नियमाप्रमाणेच सुरू राहील असेही स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यातील सफाईच्या क्षेत्रात व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या हजारो कामगारांच्या पाल्यांना या निर्णयामुळे दामदुप्पट लाभ मिळणार आहे. विशेष म्हणजे या योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणत्याही जात/धर्म याचे बंधन असणार नाही हे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.



## 'राष्ट्रसेवा मिल्ट्री फाऊंडेशन' लौकिकास पात्र ठरेल

### महाराष्ट्र केसरी शिवाजी केकान यांना विश्वास

▶ प्रतिनिधी

दिंद्रुड : राष्ट्रसेवा मिल्ट्री फाऊंडेशन कॅम्प आणि करिअर अकॅडमी आपल्या कार्यपध्दतीतून लौकिकास पात्र ठरेल, असा विश्वास देतपातळीवरील प्रसिद्ध मल्ल तथा महाराष्ट्र केसरी किताब विजेते शिवाजी केकान यांनी व्यक्त केला. 'राष्ट्रसेवा'च्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानी केकान होते.

कार्यक्रमाला मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे माजी प्रमुख ओमप्रकाश शेटे, संगमचे सरपंच भगवान कांदे, संकल्प फाऊंडेशनचे संदीप तिडके, चाटगावचे उपसरपंच बालासाहेब केकान, माजी सरपंच भागवत सांगळे, देवदहिफळचे सरपंच श्रीधर बडे, युवा नेते युवराज ठोंबरे, अतुल ठोंबरे, माधव केंद्रे, सुग्रीव मुंडे, आदींची उपस्थिती होती. क्रांती बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने राष्ट्रसेवा मिल्ट्री फाऊंडेशनची उभारणी करण्यात आली आहे, अशी माहिती संचालक, सैनिक गणेश केकान (पुणे) यांनी दिली. मिल्ट्री कॅम्प नावारूपास आणण्यासाठी कृष्णा केकान, दीपक सांगळे, अर्जुन सांगळे, गोपीनाथ सांगळे अथक परिश्रम घेत आहेत.

### दर्जेदार सेवांसह तज्ज्ञांकडून प्रशिक्षण

राष्ट्रसेवा मिल्ट्री फाऊंडेशनमध्ये प्रशस्त निवास व्यवस्था, दर्जेदार भोजन आणि तज्ज्ञांकडून उमेदवारांना प्रशिक्षण दिले जात आहे. त्यात शारीरिक आणि लेखी परिक्षांचा समावेश होतो. सोल्जर जीडी, टेक्नीकल, नर्सिंग, ट्रेडमॅन, टी.ए., यासह सरकारच्या संरक्षण खात्यातील सर्व भरत्यांचे योग्य प्रशिक्षण दिले जात आहे, अशी माहिती संचालक गणेश केकान यांनी 'वर्तमान'शी बोलताना दिली.





गंगा राठोड | गोपिका सावंत | माया घनघाव | सुनिता घनघाव | उजमा शेख | गंगा धुमाळ | कविता जाधव | अरुणा पवार | यशोदा चव्हाण | भागुबाई चव्हाण

## मोगऱ्यात महिला सबलीकरणाचा नवा इतिहास

### १३ पैकी १० ग्रामपंचायत सदस्य महिला; सत्तेची दोरी मात्र पुरूषांकडे

▶ बाबा श्रीहरी देशमाने

माजलगाव : तालुक्यातील मोगरा ग्रामपंचायतीत अनोखे महिला सबलीकरण झाले असून १३ पैकी तब्बल १० ग्रामपंचायत सदस्य महिला आहेत, दरम्यान ग्रामस्थांनी १० जणींची हाती ग्रामपंचायतीची दोरी देवून नवा इतिहास निर्माण केला असला तरी सरपंच, उपसरपंच पुरूष झाल्याने सत्तेच्या दोरीपासून मात्र त्या वंचित राहिल्या आहेत.

'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाची उध्दारी' असे म्हटले जाते. मोगरा ग्रामपंचायतीने १० महिला सदस्य निवडून देवून एक वेगळा इतिहास निर्माण केला आहे. राजकारणातील महिलांचा टक्का वाढल्याने मोगरा ग्रामपंचायत आधुनिक विचारांची कृतिशील ठरली आहे. मात्र असे असले सरपंचपदी शामराव राठोड तर उपसरपंचपदी तुकाराम भोजणे या पुरूषांची वर्णी लागली आहे.

अलिखित करारानुसार पुढील ३ वर्ष पुरूषांच्या हाती सत्तेची दोरी राहणार आहे. तर शेवटची २ वर्ष महिलांना सत्तेत स्थान दिले जाईल, अशी माहिती वर्तमानशी बोलताना शामराव राठोड यांनी दिली. गंगा राठोड या सरपंच तर गोपिका सावंत उपसरपंच होतील.

मोगरा ग्रामपंचायतमध्ये १३ सदस्यांपैकी १० सदस्य महिला निवडून दिल्याने या गावाने महिला सबलीकरणाचे एक पाऊल पुढे टाकले आहे, त्याचे सर्वत्र स्वागत झाले पाहिजे.

## संपादकीय

# वेलकम टू बायडेन

अमेरिकेत बायडेन पर्वाला प्रारंभ झालेला आहे. बायडेन यांच्याकडून अमेरीकन जनतेला खूप अपेक्षा आहेत. जोसेफ आर बायडेन यांनी २० जानेवारी २०२१ रोजी अमेरिकेचे ४६ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून आणि कमला हॅरिस यांनी उपाध्यक्ष म्हणून अधिकार पदाची व गोपनीयतेची शपथ घेतली आणि जगातील महासत्ता असलेल्या या देशात लोकशाहीच्या नव्या अध्ययाला सुरुवात झाली. शपथविधी पूर्ण होताच, अमेरिकन जनतेत जल्लोश झाला आणि बायडेन फॉर यूएसए अशा घोषणा, रंगीबेरंगी बॅनर्स, टीव्हीच्या पडद्यावरून जगभर झळकलेले बघायला मिळाले. बायडेन हे ७८ वर्षाचे असून आजवरच्या अध्यक्षांमध्ये वयाने सर्वात मोठे आहेत. कमला हॅरिस यांच्या निवडीने, तर अमेरिकेच्या लोकशाहीत इतिहास नोंदवला गेला. त्या उपाध्यक्ष पदावर निवड झालेल्या पहिल्याच महिला आहेत, गैरश्वेतवर्णीय आहेत आणि मूळच्या भारतीय वंशाच्या आहेत. वॉशिंग्टनमधील कॅपिटॉल हिल्सवर दोन आठवड्यांपूर्वीच मावळते राष्ट्रध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या समर्थकांनी हिंसाचार केला, धुडगूस घातला. नासधूस केली. पोलिसांना अश्रुधूर व गोळीबार करून दंगलखोरांना पांगवावे लागले. त्याच ठिकाणी बायडेन व कमला हॅरिस यांचा देशाच्या सर्वोच्च पदांसाठी शपथविधी झाला. बायडेन यांनी १२८ वर्षाच्या जुन्या बायबलच्या प्रतीवर हात ठेऊन शपथ घेतली. त्यांनी केलेल्या बावीस मिनिटांच्या भाषणात २३८१ शब्द होते. त्यात त्यांनी बारा वेळा डेमॉक्रॅसी, ९ वेळा युनिटी, ५ वेळा असहमती, ३ वेळा भय या शब्दांचा उच्चार केला. अमेरिकेचे तीन माजी राष्ट्राध्यक्ष त्यांच्या पत्नीसह बायडेन यांच्या शपथविधी सोहळ्यास उपस्थित होते. जॉर्ज डब्ल्यू बुश व त्यांची पत्नी लारा बुश, बराक ओबामा व त्यांची पत्नी मिशेल आणि बिल क्लिंटन व त्यांची पत्नी हिलेरी हे आवर्जून उपस्थित राहिले. मात्र मावळते अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे गैरहजर राहिले व त्यांनी राजशिष्टाचाराला हरताळ फासण्याचे काम केले. गेल्या एकशे एकावन्न वर्षात असे प्रथमच घडले की, नव्या राष्ट्राध्यक्षांच्या शपथविधी समारंभाला मावळते राष्ट्राध्यक्ष अनुपस्थित राहिले. बायडेन यांनी आपल्या पहिल्याच भाषणात कॅपिटॉल हिल्सवर झालेल्या हिंसाचाराचा उल्लेख केला. हिंसाचार करणाजयांना वाटले की, जनतेचा कौल बदलेल, हिंसेने लोकशाही पद्धतीला रोखता येईल, पण तसे घडले नाही व यापुढेही असे होणार नाही, असे बायडेन यांनी ठणकावून सांगितले. लोकशाही ही मौल्यवान आहे, लोकशाही आहे म्हणून उमेदवाराचा विजय होऊ शकतो, असहमती किंवा विरोध व्यक्त करायचा असेल तरी लोकशाही असलीच पाहिजे, असे त्यांनी ठामपणे म्हटले. अमेरिकेचा आत्मा व भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी एकजूट महत्त्वाची आहे, या मुद्द्यावर बायडेन यांनी भर दिला. एकजूट असेल, तर चांगल्या नोकजया मिळू शकतील, मुलांना सुरक्षित ठेवता येईल आणि महामारीवरही विजय मिळवता येईल, हे त्यांनी स्पष्ट केले. ९/११ चा अमेरिकेवरील हल्ला असो किंवा जागतिक मंदी असो, एकजूट राखली, तर संकटावर मात करता येते हे त्यांनी आवर्जून सांगितले. ज्यांनी मला साथ दिली व ज्यांनी मला विरोध केला, त्या सर्वांचा मी राष्ट्राध्यक्ष आहे. एखाद्या मुद्द्यावर अहसमती असणे म्हणजे लढाई नव्हे हेही त्यांनी स्पष्ट केले. लाल असो किंवा निळा, ग्रामीण असो किंवा शहरी, सनातन असो की, उदारमतवादी यांच्या वादातून आपल्याला पुढे जायचे आहे, दया व सद्भावना घेऊन मार्ग काढायचा आहे, असा मंत्र बायडेन यांनी दिला आहे. गेल्या चार वर्षात अमेरिकेत डॉनचा कारभार चालू होता, आता शांतता व सद्भावनेच्या मार्गावरून अमेरिकेला पुढे न्यायचे आहे, हा त्यांचा अजेंडा आहे. राष्ट्राध्यक्ष बायडेन यांच्या पहिल्या भाषणाचा मसुदा भारतीय वंशाचे विनय रेड्डी यांनी तयार केला होता, ही बाब सर्व भारतीयांना अभिमान वाटावी अशीच आहे. बायडेन यांच्या व्हाइट हाऊसमधील प्रशासनात तेरा महिलांसह भारतीय वंशाचे एकूण वीस उच्चपदस्थ अधिकारी आहेत. त्यांना बायडेन यांनी नामनियुक्त केले आहे. नीरा टंडन यांची व्हाइट हाऊसमध्ये डायरेक्टर ऑफ मॅनेजमेंट अँड बजेट या पदावर नेमणूक झाली आहे. डॉ.विवेक मूर्ती यांची अमेरिकन सर्जन म्हणून नेमणूक झाली आहे. कोरोना टास्क फोर्सची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे, वनीत गुप्ता यांची डिपार्टमेंट ऑफ जस्टीसमध्ये असोसिएट ॲटर्नी जनरल या पदावर नेमणूक झाली आहे. ओबामा प्रशासनात ते सिव्हिल राईटस डिपार्टमेंट संभाळत होते. उजरा जिया या सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर सिव्हिलीयन सिक्योरिटी, माला अडिगा या फ स्ट लेडील बायडेन यांच्या पॉलिसी डायरेक्टर, गरिमा वर्मा या फस्ट लेडीच्या ऑफिसमध्ये डिजिटल डायरेक्टर, सबरिना सिंह व्हाइट हाऊसच्या डेप्युटी प्रेस सेक्रेटरी, आयशा शाह व्हाईट हाऊसमधे डिजिटल स्ट्रॅटिजीच्या पार्टनरशिप मॅनेजर, समिरा फाजिली व्हाइट हाऊसमध्ये यूएस नॅशनल इकॉनमी कौन्सिलच्या डेप्युटी डायरेक्टर, गौतम राघवन प्रेसिडेंट ऑफिसचे डेप्युटी डायरेक्टर, विनय रेड्डी यांची डायरेक्टर ऑफ स्पीच रायटिंग, वेदांत पटेल यांची राष्ट्राध्यक्षांचे असिस्टंट प्रेस सेक्रेटरी, तरुण छाबडा यांची डायरेक्टर फॉर टेक्नॉलॉजी अँड नॅशनल सिक्युरिटी, सुमोना गहा यांची डायरेक्टर फॉर साऊथ एशिया, शांती कलाथिल यांची को-ऑर्डिनेटर फॉर डेमॉक्रॅसी अँड ह्युमन राइटस, सोनिया अग्रवाल यांची व्हाइट हाऊसमध्ये सीनिअर ॲडव्हायजर फॉर डोमॅस्टिक क्लाइमेट पॉलिसी अँड इनोव्हेशन, विदूर शर्मा यांची कोविड रिन्स्पॉन्स टीमचे पॉलिसी ॲडव्हायजर, नेहा गुप्ता यांची व्हाइट हाऊसमध्ये असोसिएट कौन्सिल, रिमा शहा डेप्युटी असोसिएट कौन्सिल, अशा महत्त्वाच्या पदावर या नेमणुका झाल्या आहेत. अमेरिकेच्या बत्तीस कोटी लोकसंख्येत भारतीय वंशाचे ३२ लाख लोक असून मेडिकल, एज्युकेशन, हॉस्पिटॅलिटी, टेक्नॉलॉजी अशा क्षेत्रांत त्यांचा दबदबा आहे. सार्वजनिक समाजसेवेत भारतीय लोक कित्येक वर्षे आघाडीवर आहेत. बायडेन पर्वाला तूर्त शुभेच्छा देऊया, वेलकम टू बायडेन!

# कुणाच्या मालकीची आहे का भाषिक संस्कृती?

**जर्मन आणि मराठीतले कित्येक शब्द एकसारखे. अरबी, पर्शिअन, पश्तू, अफगाणी, उर्दू, हिंदी, खडीबोली. शब्द काय भाषाही संक्रमित झाल्यात. अगदी प्राचीन काळापासून लोक आणि त्यासोबत त्यांच्या संस्कृती इकडून तिकडं गेल्या. कोण कशावर मालकी दाखवणार? म्हणूनच गेल्या १५ वर्षापासून लंडनमधे राहणाऱ्या शबाना वारणे यांचे हे अनुभव वाचायलाच हवेत.**

२७ फेब्रुवारी मराठी भाषा गौरव दिन. पण मराठीचा अभिमान, प्रेम तर आपल्या मनात वर्षभर असतं. आपली मराठी भाषा खरोखर सुंदरच आहे. कारण, ती वाहती आहे. जगभरातल्या अनेक भाषांतून तिनं अनेक शब्द घेतलेत. अनेकदा त्याचं आपल्या आपल्या प्रकारात रुपांतरणही केलंय. अनेकांना हे रुपांतरण झालेले शब्द दिलेतही. जर्मन आणि मराठीतले कित्येक शब्द एकसारखे. अरबी, पर्शिअन, पश्तू, अफगाणी, उर्दू, हिंदी, खडीबोली. शब्द काय भाषाच संक्रमित झाल्यात. आज देश आणि राज्यांच्या सीमा आपण बघतो. पण अगदी प्राचीन काळापासून लोकांचे, संस्कृतीचे एकप्रकारे मुक्त प्रवाह लोकांबरोबर इकडे तिकडे गेले. कोण कशावर मालकी दाखवणार? जेत्यांची संस्कृती लादली जाते हे खरं. पण त्यात त्या काळाच्या राजकीय आणि आर्थिक हीतसंबंधांचा जास्त भाग असतो. आपण मात्र इतिहासाच्या एका तुकड्याला धरून अस्मितेचं राजकारण करत असतो. माझ्या लहानपणी गावात जी भाषा शिकले तीच आजही मला जवळची वाटते. पुण्यात आल्यावर अजूनही कुणी न' आणि ण' याच्या अगणित चुका काढल्या तर त्यांची मला तेवढीच कीव येते जेवढी माझ्या लहानपणी भेटायला येणाऱ्या माझ्या भेंडीबाजारातल्या भावंडांची. त्यांना आम्ही मराठी बोलायचो म्हणून गावठी, मागासलेले, अधार्मिक वाटायचो! असो ज्याच्या त्याच्या कुवतीनुसार, जगाच्या अनुसार लोक भाषेची तुलना आणि उतरंड लावतात.

भाषा एक माध्यम आहे. संवाद महत्त्वाचा! जिथं संवादच थांबतो आणि शिव्या सुरु होतात त्या मात्र सगळ्या भाषांमधे सारख्याच. सगळा आशय स्त्रियांना कमी लेखणारा! आमच्याकडे तर सगळेजण वेगळी भाषा बोलतात. माझे आई आणि बाबा दोघं महाबळेश्वरच्या धावडी घरात जन्मले, वाढले. आईचं शिक्षण चौथीपर्यत उर्दू शाळेत. पुढं मुलींसाठी शाळा नाही. तिचा एक मावसभाऊ मराठी शाळेत तिच्या पुढच्या इयत्तेत. त्याच्याकडून मधल्या कुडाच्या भिंतीआडून ही मराठी शिकली. हट्टाने सातवीची परीक्षा दिली आणि मास्तरीण झाली. तिला उर्दू आणि मराठी भाषा उत्तम येतात. तिच्यामुळेच मराठीची आवड आम्हा बहिणींमधे! गुरुजी आणि बाईंची मुलं म्हणून शाळेत, गावात लहानपणी वेगळा भाव होता. त्यांचं मार्गदर्शन, घरातलं वातावरण म्हणून आम्ही प्राथमिक मराठी शाळांमधून चमकलोही! पुण्यात पुढच्या शिक्षणासाठी आल्यावर तीच भाषा बऱ्याच लोकांना अशुद्ध वाटली. अजूनही च, न, ण असे शुद्धीकरणाचे प्रयत्न चालू असतात. असो बापडे! माझीच लाल असं जेव्हा सिद्ध करायला कुणी जीव तोशीस लावून उठतं तेव्हा उनको उनके हाल पे छोडना' हाच उत्तम मार्ग असतो. लहानपणापासून आम्ही सातत्याने ऐकलेला कौतुक आणि अविश्वासदर्शक वाक्प्रचार म्हणजे तुम्ही मुस्लिम असून मराठी एवढं चांगलं बोलता?' त्यात आडनाव पण आमचं शेख किंवा खान नाही. त्यामुळे काहीजण तर वडील नक्कीच मुस्लिम नसणार असा निष्कर्ष काढून मोकळे! त्यात इकडे येऊन आता वारणेचे 'वॉर्न' झालो. त्यामुळे नक्कीच कोणा गोऱ्याबरोबर संसार मांडला असेल, असं सगळेच समजतात. आता कुणाकुणाचे उच्चार आणि समज बदलत बसणार!



माझी मुलगी मुंबईत जन्मली. आईच्या घरी पाचगणीला लहानपणी राहिली. नंतर आम्ही भोपाळ, लंडन करत ती तळेगावला हॉस्टेलवर अनेक गुजराती मुलांबरोबर तीन वर्ष राहिली. तिच्या एका वाक्यात या सगळ्या ठिकाणाचं शब्द, हेल, वाक्प्रचार यांचं मिश्रण आहे. जिथं तिला ही भाषा कमी पडते तिथं तिला बॉलीवूड नेमका हात देतं. गेल्यावर्षी पंधरा वर्षाची असताना ती एकटी लंडन, दिल्ली, भोपाळ, मुंबई, पुणे, पांचगणी, सांगली अशी फिरून आली. मस्त लोक आणि भाषा यांच्या असंख्य आठवणी घेऊन. मुलाचा जन्म इथलाच. मुलांना वयाच्या पाच वर्षापर्यत भाषा आत्मसात करण्याची जास्त कुवत असते. त्यामुळे त्यांचा बौद्धिक विकास चांगला होतो. मला स्वतःला कुठलीही भावना व्यक्त करताना हमखास मराठी शब्द आधी तोंडात येतो. असं असूनही मुलाच्या वयाच्या पाच वर्षापर्यत त्याला



काही मराठी शिकवण्यात मी सफल झाले नाही. त्याचं इंग्रजीही आमच्यापेक्षा वेगळंच ऐकू येतं. त्याच्या मते तर आम्ही इंडियन इंग्लिश बोलतो. इथल्या शाळांमधे मूकबधीरांसाठीची भाषा अगदी नर्सरीपासून शिकवतात. चिन्ह भाषा हा शब्द मला तितकासा पटत नाही. ती घरात फक्त त्यालाच येते. मी खूप वेळा त्याच्याकडून शिकायचा प्रयत्न केला. या सगळ्या प्रकारात त्यानंही

**वर्तमान स्पेशल**

**शबाना वारणे**

माझ्यासारखा त्याला मराठी, हिंदी शिकवण्यातला निष्फळपणा तेवढ्याच उद्विग्नतेनं अनुभवलाय! भारतभेटी आणि हिंदी सिनेमा यामुळे आता त्याला मराठी, हिंदी शिकायची इच्छा मात्र निर्माण झालीय. तो तसा प्रयत्न स्वतःहून करायला लागलाय. त्याच्या वयानुसार त्याला आता आपण इथल्या मुलांपेक्षा वेगळं आहोत, आपल्या घरचं वातावरण वेगळं आहे आणि भाषाही वेगळी आहे हे कळू लागलंय. त्याला हे समजून घेण्यात आणि शिकण्यात रस निर्माण झालाय. अगदी आपली चड्डी सांभाळायचं ज्ञान नसतं अशा दोन तीन वर्षाच्या मुलांना हीच आपली भाषा, संस्कृती आणि आपण असंच वागायला पाहिजे हे थोपवणं मला खरं अन्यायकारक वाटतं. यात 'आपली' म्हणजे कुणाची भाषा, कुणाची संस्कृती हाही प्रश्न आहेच.

आंतरजातीय, आंतरधर्मीय कुटुंबं आता सगळीकडेच दिसतात. अगदी परदेशी नाही गेलात तरी सातारा, सांगली, पुणं, विदर्भ, खानदेश इथली बोली वेगळी. मग आईच्या घरी बोलतात ती मराठी का बाबाची पुण्याची अलंकारिक मराठी? का तिकडच्या आजीच्या घरची गुजराती? या सगळ्या वावटळीत मला मुलांवर असं जबरदस्तीचं संस्करण कधीच पटलं नाही. त्यामुळे त्यांच्या दोन्हीकडच्या संबंधावर, संवादावर काही फरक पडलाय असंही वाटलं नाही. आपल्या घरी, ज्या परिसरात आपण वाढतो त्याच्याशी आपली नाळ जुळणं, जातो तिथं आत्मविश्वासानं वागता येणं, चार माणसं जोडणं आणि कुठलाही गंड न बाळगता मानसिक दृष्ट्या सक्षम आणि संवेदनशील असणं याला माझ्या मते जास्त महत्त्व आहे.

जन्म, विकास, मरण हा तर सृष्टीचा नियम आहे. त्याचबरोबर परस्परावलंबी विकास हे उत्क्रांतीचं तत्त्व आहे. भाषा कशी याला अपवाद असणार? माझ्या आजोबांना मोडी यायची. माझे बाबा बोरू वापरून खूप सुंदर लिहायचे. माझी आई गरज आणि शाळेची उपलब्धता म्हणून मराठी शिकली, शिक्षिका झाली. आमच्या वेळेनुसार आम्ही अगदी पदव्युत्तर शिक्षणापर्यत मराठीतच शिकलो. गरज म्हणून इंग्रजी आत्मसात केली. आमची मुलं आज इथल्या वातावरणात नवीन भाषा, नवीन संस्कृती शिकतायंत. काय चांगलं आणि काय कमस्सल हे कसं ठरवणार? माझ्यासारख्या टायपिंग शिकून, कीबोर्ड संगणक शिकणाऱ्या पिढीला माझ्या मुलांची टच स्क्रीन वापरणारी पिढी मागास समजणार की हा तंत्रज्ञानाचा विकसित अविष्कार समजणार हे आपण काय दृष्टिकोन त्यांना देतो यावर अवलंबून आहे. बोरूच्या लिखाणातली सुंदरता आणि आजच्या टच स्क्रीनमधून रेखाटलेली, संपादित केलेली कलाकृती यांची तुलना होऊ शकत नाही. पण आपापल्या परीने दोन्ही सुंदर आहेतच ना!

गेल्या १५ वर्षापासून लंडनमधे राहणाऱ्या शबाना वारणे यांचा भाषेचा अनुभव हेच सांगतो. लंडनमधे त्या सरकारसोबत चाईल्ड प्रोटेक्शन पॉलिसीवर काम करतात. १९९५ ला मुंबईच्या टाटा समाज विज्ञान संस्थेतून त्यांचं मास्टर्स इन सोशल वर्क झालं होतं. त्यानंतर १० वर्ष महाराष्ट्रात सामाजिक चळवळींशी जोडून घेत त्यांनी अनेक प्रकल्पांवर काम केलं. त्यानंतर त्या लंडनला गेल्या. १५ वर्षात लंडनमधे भाषेविषयी काय काय अनुभवलं ते त्यांनी फेसबुकवर टाकलं होतं. त्या पोस्टचा हा संपादित अंश. माझी इथली टर्किश शेजारीण तिच्या नातवांशी बोलते तेव्हा कितीतरी 'मराठी' शब्द येतात. भगन' हा त्यातलाच एक. चा' म्हणजे चहा आणि बाबा' म्हणजे बाबा. जेवायला गेलो की भरीत हा त्यांचा आवडीचा पदार्थ. मोठी भाकरी करतात मधे काही काही भरुन. ते भरीत. दुसरी शेजारीण बांग्लादेशी सिलेटी. पूर्व पाकिस्तानच्या प्रभावात आणि नंतर आता इस्लाम टीवीमुळे खूप उर्दू शब्द आले त्यांच्याकडे. पण कुणी आजारी पडलं की आधी 'औषध' शोधतात! मला तर ते बोर्गी म्हणतात. कारण मराठ्यांच्या त्या प्रांतातल्या स्वाऱ्या आणि त्यांची किल्लेबांधणी. आता बर्ग हा मुळात 'जर्मन प्रशियन' भाषेतला. त्यातून त्याचं बोर्ग झालं. शिवाजीचं तिकडचं नाव बोर्गी'. मी मराठ्यांच्या प्रांतातली म्हणून बोर्गी.

(लेखिका लंडनस्थित भारतीय आहेत.)

# 'आधार'मुळे भीमराव 'लिंक'

**बीड जिल्ह्यातील छत्रबोरगाव येथील भीमराव शिंदे हा बालक आधार लिंकमुळे त्याच्या आई-वडीलांना मिळाला. कित्येक वर्षे निराधार जीवन जगणाऱ्या भीमरावची चित्रपटात शोभेल अशी कहाणी त्याचा पाठपुरावा करणारे नरेशसिंह ठाकूर यांच्या शब्दांत 'वर्तमान'च्या वाचकांसाठी देत आहोत.**

सर, या हनुमानचे आधार कार्ड काही निघत नाही बघा..! मी शाळेत जाऊन सांगते की, याला बिना आधार कार्ड चे बसवा. नळदुर्ग येथील 'आपले घर' च्या गृहमाता काहीशा रागातच बोलल्या. त्यांच्या हाता मध्ये आधार कार्ड नोंदणी अयशस्वी झाल्याची पावती होती. हनुमान तेंव्हा ६ वी च्या वर्गात शिकत होता. मी त्या गृह मातेला म्हणालो की, शांत व्हा, आपल्याला नेमकी काय अडचण येत आहे व का? याचा अभ्यास करावा लागेल. मी हनुमानाची केस फाईल हातात घेतली आणि एक एक कागद बारकाईने पाहण्यास सुरुवात केली.



२०१६ मध्ये हनुमान परभणी जिल्ह्यातील मानवत रेल्वे स्थानकावर रेल्वे पोलिसांना एकटा फिरताना सापडला होता. त्यांनी केस फाईल मध्ये लिहिलेल्या तपशील प्रमाणे त्याला आपलं नाव काय? आपण कुठे राहतो? कुठून आलो हे सांगता आले नाही. तो एवढंच म्हणाला की माझी आजी मला इथे सोडून गेली ती तुळजापूर ला राहते. मानवत रेल्वे पोलिसांनी त्याला परभणी बालकल्याण समिती कडे सोपवले. मुलाने सांगितलेल्या माहितीच्या आधारे तो तुळजापूर येथील असेल असा अंदाज लाऊन त्यांनी त्या मुलाला उस्मानाबाद बाल कल्याण समिती कडे सोपवले आणि मग त्याचा प्रवेश 'राष्ट्र सेवा दल संचलित आपले घर बालगृह, नळदुर्ग' या ठिकाणी झाला. त्याला 'हनुमान' असे नाव एका गृह मातेने दिले.२०१६ ते २०२० हे चार वर्ष हनुमान च्या पालकांचा शोध सुरू होता. ' आपले घर ' व बाल कल्याण समिती उस्मानाबाद यांच्या मार्फत अनेक वेळा वेग वेगळ्या समुपदेशकांच्या मार्फत हनुमान चे समुपदेशन करण्यात आले. परंतु त्याला काहीच आठवत नव्हते. ' आपले घर ' चे कर्मचारी त्याला अनेकदा तुळजापूर ला वेग वेगळ्या भागात घेऊन गेले, खूप चौकशी केली पण काही तपास लागत नव्हता. अभ्यासात हनुमान खूप हुशार निघाला. त्याने इयत्ता ५ वी ची स्कॉलरशिप परीक्षा देखील दिली होती. औरंगाबाद येथील एक निवृत्त शिक्षिका आपले घर येथे राहत होत्या त्यांचे हनुमान च्या अभ्यासाकडे विशेष लक्ष होते.



**अनुभव**

**नरेशसिंह ठाकूर**

दि.२५ नोव्हेंबर २०१९ मी केस फाईल वाचून बंद केली. सगळा तपशील वाचल्यानंतर माझ्या लक्षात आले की, हनुमान चे पालक शोधण्यासाठी खूप मेहनत घेण्यात आली परंतु त्याचे आधार कार्ड का निघत नव्हते याच्याकडे कोणाचेच लक्ष गेले नाही. मी युनिक आयडेंन्टीफिकेशन ऑथोरिटी ऑफ इंडियाच्या अधिकृत संकेतस्थळावर ईमेलद्वारे ही सर्व माहिती पाठवली. सोबत आधार कार्ड नोंदणी अयशस्वी झाल्याची पावती पाठवली. काही दिवसांनी त्यांचे उत्तर मिळाले. आम्ही ज्याचे हनुमान घाडगे नावाने आधार कार्ड काढण्याचा प्रयत्न करत होतो. त्याचे मूळ नाव भिमराव मच्छिंद्र शिंदे आहे, त्याचे आधार कार्ड २०१३ सालीच काढले आहे व तो माजलगाव तालुक्यातील रहिवाशी असल्याचे समजले. उत्तर पाहून माझा आनंद गगनात मावेना. परंतु त्याचा नेमका पत्ता मिळेना. त्यासाठी हनुमानचे आधार कार्ड मिळवणे आवश्यक होते.आम्ही आता युआयडीएआयच्या मुंबई येथील कार्यालयात जाण्याचे ठरवले. सदर माहिती मी बालकल्याण समिती उस्मानाबाद येथील अधिकाऱ्यांना व संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक पन्नालाल सुराणा यांना कळवली. आदरणीय पन्नालाल भाऊ यांनी मला ४ डिसेंबर २०१९ ला मुंबई येथे हनुमान ला घेऊन येण्यास सांगितले. रेल्वे चे आरक्षण मिळवण्याचा प्रयत्न केला परंतु मिळाले नाही. मग सोलापूरहून रात्रीच्या सिद्धेश्वर एक्स्प्रेसने मी आणि हनुमान मुंबईच्या दिशेने निघालो. जनरल डब्यात जिथे सामान ठेवतात त्या फळीवर बसून आम्ही दोघांनी कसा बसा प्रवास केला. रेल्वेत मी रात्रभर जागा होतो. हनुमान ला त्याच घर मिळणार या आनंदात मला झोप आली नाही. पहाटे ५ वा. वेळेचे पक्के असणारे ८७ वर्षीय पन्नालाल भाऊ आमची दादर रेल्वे स्थानकावर आमची वाट पहात थांबले होते. दादर ला उतरल्यावर आम्ही भाऊंचे परिचित श्री सुधीर देसाई यांच्या घरी गेलो. त्यांनी आमच्या साठी वाहनाची व्यवस्था केली व शुभेच्छा दिल्या. बरंच फिरल्यानंतर कुलाबा येथील एमटीएनएल बिल्डिंगमध्ये युआयडीएआयचे कार्यालय सापडले. तेथील अधिकाऱ्यांना सर्व माहिती दिली. त्यांनी हनुमानाच्या बोटाच्या ठसाच्या आधारे पडताळणी केली. परंतु नियमाप्रमाणे केवळ आधार नंबर दिला व असे सांगितले की या आधारकार्ड ला नव्याने मोबाईल नंबर लिंक करा व तेंव्हाच तुम्हाला मूळ आधार कार्ड मिळवता येईल. आम्ही मुंबईहून परतलो लगेच मी दुसऱ्या दिवशी हनुमान ला घेऊन तुळजापूर येथील एका आधार केंद्रावर गेलो आणि नव्याने मोबाईल नंबर लिंक केला.दिनांक २७ फेब्रुवारी २०२० रोजी मोबाईल नंबर यशस्विरीत्या लिंक झाल्याचे समजले व आम्ही हनुमानचे मूळ आधार कार्ड डाऊनलोड केले. समोर माहिती आली. भिमराव मच्छिंद्र शिंदे, छत्रबोरगाव, ता.माजलगाव, जि.बीड. एक क्षणाचाही विलंब न करता मी माजलगावच्या राष्ट्र सेवा दल च्या कार्यकर्त्या ॲड.सुलभाताई देशमुख यांना फोन करून सर्व माहिती दिली. त्यांनी ताबडतोब स्थानिक कार्यकर्त्यांच्या मदतीने हनुमानच्या पालकांचा शोध घेतला. दिनांक २७ फेब्रुवारी २०२० च्या रात्री हनुमानचे वडील व त्यांच्यासोबत माजलगाव येथील पत्रकार मंडळी श्री.भगीरथ तोडकरी, श्री सुहास सावंत, श्री.सुनिल चौरे इत्यादी लोक पोहोचले. चार वर्षामध्ये सर्व काही विसरून जाणाऱ्या हनुमान ने एका क्षणात आपल्या वडिलांना ओळखले व धावत जाऊन तो आपल्या वडिलांना बिलगला समोरचा देखावा निश्चितच सर्वांच्या डोळ्यामध्ये आनंदाश्रू आणणारा होता. दुसऱ्या दिवशी बालकल्याण समिती उस्मानाबाद यांच्या परवानगीने हनुमानला त्याच्या पालकांकडे रितसर सोपवण्यात आले. या घटनेला २८ फेब्रुवारी २०२१ रोजी एक वर्ष पूर्ण होत आहे. माझ्या मनात मागे वळून पाहिल्यानंतर प्रश्न येतो की खरंच असे अजून किती हनुमान आहेत? जे ज्ञात-अज्ञात पणे घरातून निघून गेले व आजही दारोदर फिरत आहेत किंवा बालकाश्रमात आहेत परंतु त्यांच्या पालकांचा शोध अद्याप लागलेला नाही. मला खरोखरच हनुमानच्या पालकांचे कौतुक वाटते की त्यांनी वेळेवर हनुमानचे आधार कार्ड काढलेले होते व त्यामुळेच त्याची ओळख पटवण्यात यश आले व त्याला सुखरूप पणे त्याच्या घरापर्यंत आम्हाला पोहोचवता आले. मी या मध्ये सर्व श्रेय खरोखरच हनुमानच्या पालकांना देईल अशाच पद्धतीने अनेक पालकांच्या शोधात असलेल्या मुलांना 'आपले घर' मिळावे हीच सदिच्छा.

# संत शिरोमणी गुरु रविदास व संत कंकय्या जयंती उत्साहात

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे आयोजन

प्रतिनिधी

माजलगाव : राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने शनिवारी संत रविदास सभागृह बायपास रोड येथे आयोजित संत शिरोमणी गुरु रविदास महाराज व संत कंकय्या महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिद्धेश्वर महाविद्यालयाचे प्रा.डॉ.गोरख फसले तर उद्घाटक म्हणून नगराध्यक्ष शेख मंजूर उपस्थित होते. प्रथम मान्यवरांचे शुभहस्ते संतशिरोमणी गुरु रविदास महाराज, संत कंकय्या महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले, छत्रपती राजर्षी शाहू महाराज ,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी औरंगाबाद येथे पोलीस निरीक्षकपदी पदोन्नती मिळाल्याबद्दल तलवाडा येथील सुरेश उणवणे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस सुनिल शिंदे, भाजपा ज्येष्ठ नेते सत्यनारायण उणवणे, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते सुनिल खंडागळे, गंगामसला माजी सरपंच तथा जयंती अध्यक्ष अ‍ॅड.गणेश गवळी, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके, नगरसेवक सचिन डोंगरे, युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव,जिल्हा संपर्क प्रमुख रमेशराव जगताप, अंबाजोगाईचे सां.बा.विभाग लातूर आरेखक राजेंद्र घोडके, पीके ग्रुपचे मालक तथा प्रसिद्ध उद्योजक पद्माकर कांबळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते डॉ.भगवानराव सरवदे, माजी पं.स.सदस्य बाबासाहेब सवणे, मल्हार सेनेचे विलास नेमाणे, युवासेना तालुकाप्रमुख बाळासाहेब मेंडके, हभप सर्जेराव महाराज काशिद, रा.च.म.तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे उपस्थित होते. अध्यक्षस्थानावरुन बोलतांना डॉ.गोरख फसले म्हणाले, सर्वांनी एकदिलाने काम करुन समाजापुढे आदर्श निर्माण करणे आवश्यक आहे. कोरोनाचे अनुषंगाने आयोजकांनी अतिशय साध्या पद्धतीने जयंतीचे आयोजन केल्याबद्दल कौतुक केले. मला या देशात अशी व्यावस्था, असे राज्य हवे जेथे सर्वांना अन्न मिळायला पाहिजे, लहान मोठे सगळे सोबत बसायला पाहिजे, त्यांच्यामध्ये बंधुभाव निर्माण व्हायला पाहिजे तरच मला प्रसन्नता मिळेल असा समाजवादाचा सिद्धांत गुरु रवीदासांनी त्या काळात दिला होता तो सद्यस्थितीत अंमलात आणणे काळाची गरज आहे, असेही डॉ.फसले बोलतांना म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे यांनी केले तर आभार जिल्हा संपर्कप्रमुख रमेश जगताप यांनी मानले. यावेळी जयंती अध्यक्ष अ‍ॅड.गणेश गवळी, राजेंद्र घोडके, डॉ.भगवानराव सरवदे, सत्यनारायण उणवणे, सुनिल खंडागळे यांची समायोचित भाषणे झाली. जयंती यशस्वीतेसाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके ,युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव, गंगामसला माजी सरपंच तथा जयंती अध्यक्ष अ‍ॅड.गणेशराव गवळी, तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे, अशोक कांबळे, जयंती उपाध्यक्ष बजरंग खरात, सचिव प्रसाद वाघमोडे, कोषाध्यक्ष अश्विन खंडागळे, मोहनराव त्रिमुखे, भिमराव गायकवाड, राधाकिसन भाळशंकर, विष्णू गवळी, विजय नरहीर, तुकाराम जगधने, नागेश लोकरे, धनंजय गवळी,सचिन वाघमारे, भागवतराव जाधव, नवनाथ वाघमारे, भिकाजी उणवणे, संतोष जाधव, लक्ष्मण सोनटक्के यांनी परिश्रम घेतले. यावेळी अशोक वाडेकर यांच्या वतीने कै.मारोतीराव मोहनाजी वाडेकर हारकी निमगावकर यांच्या स्मरणार्थ समाजासाठी डायस भेट देण्यात आला. आयोजकांनी कोणताही खर्च न करता समाजासाठी साऊंड सिस्टीम खरेदी करुन एक वेगळा आदर्श समाजापुढे निर्माण केला त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



### 'संत रविदासांचे जातीअंताचे विचार अंमलात आणा'



भारतीय समाज सर्व जाती धर्मात विभागला असुन सर्वांनी एकत्रित राहणे आवश्यक आहे. गुण्यागोविंदाने राहण्यातच सर्वांचे कल्याण आहे. जातीअंताच्या लढ्यासाठी संत रविदासांनी सांगितलेले विचार अंमलात आणणे काळाची गरज असल्याचे मत व्याख्याते प्रसिद्ध निवेदक अशोक वाडेकर यांनी व्यक्त केले. तसेच सर्वांनी शिक्षणाबाबत सजग राहून मुलामुलींना शिक्षण देणे गरजेचे आहे. जगात शांतता नांदण्यासाठी संत शिरोमणी गुरु रविदासांचे विचार अंगीकारणे, त्याप्रमाणे मार्गक्रमण करणे आवश्यक आहे. माणसाचे मन पवित्र असेल, त्याला जातीयवादाचा स्पर्श झाला नसेल तर कुंडातही (कठौती) त्याला गंगाजलाचे पावित्र्य दिसून येईल. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेले विज्ञानवादी विचार आत्मसात करून त्याप्रमाणे सर्वांनी मार्गक्रमण करावे, असे आवाहनही अशोक वाडेकर यांनी केले.

### 'समाजाचे प्रश्न सोडवणार'



उद्घाटक म्हणून बोलतांना नगराध्यक्ष शेख मंजूर म्हणाले, चर्मकार समाजाचे जे जे प्रलंबित प्रश्न असतील ते सर्व सोडविण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहे. समाज मंदिरा शेजारील जागेत नगरपालिकेच्या वतीने तात्काळ शौचालय बांधकाम करण्यात येईल. खा.प्रितमताई मुंडे यांच्या खासदार फंडातून जो निधी संत शिरोमणी गुरू रविदास सभागृहासाठी दिलेला होता याबाबतही शासनस्तरावर पाठपुरावा करणार आहे.



# 'अलफलाह'कडून सामुहिक विवाह

## कोरोनाच्या नियमांचे सोहळ्यात तंतोतंत पालन; मुस्लिम बांधवांकडून शिस्तीचे दर्शन

माजलगाव : अलफलाह कमिटी तर्फे आयोजित करण्यात आलेल्या सामुहिक विवाह सोहळयात १७ जोडप्यांचे कोरोनाचे नियम पाळून विवाह सोहळा झाला. दरम्यान, या विवाह सोहळ्यात शासनाने आखून दिलेल्या कोरोनाबबतच्या सर्व नियमांचे पालन करण्यात आले. मुस्लिम बांधवांकडून शिस्तीचे दर्शन दिली.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अलफलाह कमिटी मुस्लिम समाजातील गरजु वधु-वरांसाठी कोरोनाची सरकारने दाखविलेल्या नियम पूर्णपणे पाळून रविवारी येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात सामूहिक विवाहमध्ये लावण्यात आले. या सोहळयात १७ विवाह लावण्यात आले. यावेळी प्रत्येक जोडप्याला संसारगाडा चालवणारे वस्तू देण्यात आल्या त्यात भांडे, पलंग, गादी, कूलर, अलमारी, सोफासेट व सर्व प्रकारचे सांसारीक वस्तू देण्यात आल्या. यावेळी विवाहसाठी मोजक्याच लोकांना प्रवेश देण्यात आला. नातेवाईकांनी मास्कचा वापर करुन कोरोनाचे नियम पाळले. तसेच प्रत्येक वर्षाप्रमाने हयाही वर्षात सामाजिक काम करणारे व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. ह्यामध्ये माजलगाव रत्न म्हणून सामाजिक कार्यकर्ते शेख जकी बाबा व डॉ.इंदाणी यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात अलफलाह कमिटींचे सदस्यांनी परिश्रम करून हा कार्यक्रम यशस्वी केला.





# प्रतीक देशमाने फाऊंडेशनतर्फे शिवजयंती उत्साहात

प्रतिनिधी

माजलगाव : 'सकल समाजासाठी एक पाऊल पुढे ' हे ब्रिद घेऊन सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रतीक देशमाने फाऊंडेशन या संस्थेच्यावतीने रयतेचे राजे,विश्ववंदनीय छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

संस्थेचे मुख्यालय असलेल्या चाटगाव येथे शिवजयंती साजरी केली.

प्रारंभी संस्थेचे सचिव तथा ज्येष्ठ पत्रकार बाबा श्रीहरी देशमाने यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपसरपंच बालासाहेब केकान, बालासाहेब हांगे, दीपक गडसिंग आदिंसह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

### 'छत्रपती शिवाजी महाराज आमची अस्मिता'

शिवजयंती कार्यक्रमात बोलताना पत्रकार बाबा श्रीहरी देशमाने म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज ही आमची अस्मिता असून तमाम भारतीयांचे प्रेरणास्थान आहे. अठरापगड जातींना बरोबर घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य निर्माण केले. त्यांच्या महान विचारांची आज प्रत्येकाला गरज आहे, असे प्रतिपादन देशमाने यांनी केले.

# शेकाप सत्तेसाठी नाही तर सत्त्यासाठी लढणारा पक्ष : अ‍ॅड.नारायण गोले पाटील

## शेतकरी कामगार पक्षाचा बीड जिल्हा आभार दौरा

प्रतिनिधी

बीड : शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने घोडका राजुरी(ब्रह्मनाथ वस्ती), उमरद खालसा,अंथरवन पिंप्री, उमरी येथे दि.२७, २८ फेब्रुवारी रोजी गावागावात व बांधा बांधावर जाऊन १२ फेब्रुवारी रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आलेल्या बैलगाडी मोर्चात सहभागी झालेल्या लढाऊ शेतकऱ्यांच्या बैलाला प्रत्येकी जोडीला दहा किलो पेंड खाद्य देऊन व लढाऊ शेतकऱ्यांचे सत्कार करून जाहीर आभार व्यक्त करण्यात आले.

शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई अ‍ॅड.नारायण गोले पाटील यांनी शेतकरी आभार यात्रेत बोलतांना, शेतकरी कामगार पक्ष हा सत्तेसाठी लढणारा पक्ष नाही तर सत्यासाठी लढणारा पक्ष आहे, बळीराजाच्या हितासाठी सदैव रस्त्यावर उतरून त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणारा पक्ष असून शेतकरी आणि कष्टकरी जनतेच्या जीवनात क्रांती घडवण्यासाठी गेल्या ७० वर्षापासून प्रमाणिकपणे लढणारा पक्ष आहे, शेतकऱ्याच्या जीवनामध्ये क्रांती घडवण्यासाठी स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करू त्यासाठी वेळप्रसंगी शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता आपल्या जीवाचे बलिदान देण्यासाठी तयार आहे. शेतकऱ्यांनी पूर्ण ताकदीनिशी शेतकरी कामगार पक्षाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून शेतकरी कामगार पक्षाच्या विचाराला झालेला बळ देण्याची गरज असल्याचे सांगितले त्या वेळी व्यासपीठावर भाई दत्ता प्रभाळे, भाई भीमराव कुटे, भाई मुकुंद शिंदे, भाई गोरख घोडके, भाई माऊली घोडके आदीची उपस्थिती होती तर घोडका राजुरी ब्रह्मनाथ वस्ती येथील श्रीमंत घोडके पाटील, रामराव कोंडीबा सकाटे, बालचंद्र साहेबराव घोडके, बालाजी साहेबराव घोडके, प्रभू श्री हरी मुळे, उत्तरेश्वर चंद्रसेन मुळे, जगन्नाथ शेषराव घोडके, जीवन पिराजी कोठुळे, धनराज रामप्रसाद मुळे, ऋषिकेश प्रभाकर मुळे, अक्षय घोडके, हर्षद मुळे, बबन घोडके, सुरेश मुळे, कांबळे, नितीन मुळे, नितीन कोठुळे, सुदर्शन रहाडे, उमरी येथील मदनराव जाधव, रघुनाथ कुटे, सुधाकर पोकळे, हनुमान कुटे, खंडु शिंदे, रणजित शिंदे, बबनराव शिंदे, बाबासाहेब शिंदे, संजय शिंदे, सुनिल कुटे, युवराज भगत, राहुल शिंदे यांच्यासह शेकडो शेतकरी बांधव उपस्थित होते.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती

प्रतिनिधी

माजलगाव : अंधश्रद्धा व अस्वछतेने बुरसटलेल्या समजाला आपल्या कार्यातून समाजसुधारणा करणारे कृतीशील सुधारक राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ.व्ही.पी.पवार यांच्यासह प्रोफेसर डॉ.जी.के.सानप, रा.से.योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.एस.एन.इप्पर, प्रा.एस.सी. मोतेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ.व्ही.पी.पवार म्हणाले की, संत गाडगे महाराज यांनी सर्वस्वाचा त्याग करून आपल्या कृतीच्या माध्यमातून स्वच्छता केली व कीर्तनातून माणसाच्या मनातली घाण काढून मानवतेचा संदेश देण्याचे महान कार्य केले. त्यांच्या कार्याचा व विचारांचा वारसा घेतला तर समाजातील दूषित भावना दूर होऊन समाजात समता प्रस्थापित होईल. यावेळी कोविड१९ च्या नियमांचे पालन करण्यात आले.





# मा.आ.मोहनराव सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान

## द्वारका अर्बनचा उपक्रम; ३८ जणांचा सहभाग

प्रतिनिधी

माजलगाव : माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार मोहनराव सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त द्वारका अर्बनच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित केले होते यामध्ये ३८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

रक्तदान शिबीर कार्यक्रमाचे अध्यक्ष कमलाकर कुरे हे होते तर उदघाटक म्हणून डॉ.सचिन डक यांची तर अमित नाटकर, बाळासाहेब तौर, महेश सोळंके, मुकुंद सोळंके, गणेश तौर, मुकुंद जोगडे, प्रल्हाद दळवी, सुनिल रत्नापारखी यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

सकाळी द्वारका अर्बन परिसरात रक्तदान शिबाराचा शुभारंभ झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक द्वारका अर्बनचे चेअरमन दिगंबर सोळंके यांनी केले. या रक्तदान शिबिरात ३८ रक्तदात्यांनी आपले रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली.

कोविड काळात मोठ्या प्रमाणावर रक्ताचा तुटवडा जाणवत असल्याने तो काही प्रमाणात कमी व्हावा त्यासाठी सामाजिक देणं म्हणून संस्थेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

### 'वर्तमान'कडून दीपकराव थावरे, अमित नाटकर यांचा सत्कार






माजलगाव : संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीच्या अध्यक्षपदी दीपकराव थावरे आणि माजलगाव तालुका समन्वय व पुनर्विलोकन समितीच्या अध्यक्षपदी अमित नाटकर यांची निवड झाल्याबद्दल वर्तमान कार्यालयात त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी मोगरा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच बबनराव पवार, दीपककुमार भालेराव, वर्तमान माध्यम समुहाचे मुख्य संपादक भगीरथ तोडकरी.

# परमपूज्य गुरुवर्य ह.भ.प.बाजीराव महाराज जवळेकर अनंतात विलीन

प्रतिनिधी

माजलगाव : महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र पैठण येथील भव्य दिव्य गीता मंदिर व गीता मंदिर मठ शेगांव दुमाला पंढरपूर संस्थान चे संस्थापक कथा प्रसिद्ध संत परमपूज्य ह.भ.प.बाजीराव महाराज जवळेकर वय ८५ वर्ष यांचे दिनांक २५ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजता श्रीक्षेत्र पैठण येथे ते अनंतात विलीन झाले आहेत. त्यांच्या जाण्याने वारकरी संप्रदायामध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या पार्थिव देहावर गीता मंदिर पैठण येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



परमपूज्य ह.भ.प.बाजीराव महाराज जवळेकर हे माजलगाव तालुक्यातील जदिद जवळा येथील रहिवासी असून वयाच्या पंधराव्या वर्षी आळंदी येथील वारकरी शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेण्याकरिता गेले. पाच वर्षाचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी ब्रह्मचर्य व्रताचे अखंड पालन करून वारकरी संप्रदायाचा मोठ्या निष्ठेने प्रचार केला. अशा वारकरी संप्रदायातील महाराष्ट्रातील नामवंत प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. बाजीराव महाराज जवळेकर यांचे हे दिनांक २५ फेब्रुवारी रोजी गुरु पुष्य अमृत योग या शुभ दिनी सकाळी साडेनऊ वाजता अनंतात विलीन झाले. त्यांच्यावर पैठण येथील गीता मंदिर परिसरात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# ग्रामीण भागात व्यापक संघटन वाढवण्याची गरज

## खासदार डॉ.प्रितम मुंडे यांचे प्रतिपादन

▶ प्रतिनिधी



माजलगाव : जेवढे संघटन मजबूत तेवढा पक्ष मजबूत होत असतो माझ्या विजयात बूथ रचनेचा मोठा वाटा असून, आगामी काळात पक्षाचे संघटन मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी परिश्रम घ्यावेत. प्रत्येक बूथ कार्यकर्ता माझा त्या गावातील प्रतिनिधी असून बूथ सक्षमीकरणासोबत कार्यकर्त्यांनी त्यांच्या गावातील प्रश्नांची सोडवणूक करावी, बूथ कार्यकर्त्यांच्या गावातील समस्या मार्गी लावण्यासाठी आम्ही प्राधान्याने कार्यरत राहू असे प्रतिपादन खासदार डॉ.प्रितम मुंडे यांनी माजलगावात आयोजित बूथ रचनेच्या बैठकीत केले.

शहरात बूथ रचनेच्या अनुषंगाने बूथ प्रमुखांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.परंतु कोरोनामुळे बूथ प्रमुखांची बैठक रद्द करून शक्ती शक्ती केंद्र प्रमुखांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी खासदार डॉ.प्रितम मुंडे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना पक्षाच्या मजबुतीकरणात बूथ रचनेचा सिंहाचा वाटा असल्याचे सांगितले. माजलगाव हा तालुका मुंडे साहेबांवर व पक्षावर प्रेम करणारा आहे. विधानसभेत जरी भाजपला अपयश पदरात पडले असले, तरी आगामी काळात होणाऱ्या सर्वच निवडणूकांसाठी बूथ रचना परिपूर्ण करणे महत्वाचे आहे, असे सांगितले. पुढे बोलतांना त्यांनी बूथ कार्यकर्ता हा त्या गावातील पक्षाचा प्रतिनिधी असतोच याशिवाय बूथ कार्यकर्त्यांनी त्यांच्या गावातील विविध समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील रहावे.

या प्रसंगी बीडच्या रेल्वे करिता मंजूर करवून आणलेल्या निधी बाबत त्यांचा अभिनंदनाचा ठराव मंजूर करून त्यांचा माजलगाव भाजपातर्फे सत्कार करण्यात आला या वेळी डॉ.प्रकाश आनंदगावकर, भाजपाचे तालुकाध्यक्ष अरुण राऊत, माजी नगराध्यक्ष डॉ.अशोक तिडके, जिल्हा सरचिटणीस डॉ.देविदास नागरगोजे, शंकर देशमुख यांच्या सह तालुक्यातील सर्व शक्ती केंद्र प्रमुख उपस्थित होते.



# अवाजवी कर आकारणी रद्द करा

## नगरसेवक शरद यादव यांची मागणी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील नगर परिषदेने मालमत्ता कर आकारणीसह इतर कर आकारणीच्या नोटिसा रहिवाशांना बजावल्या आहेत. या नोटिसांमध्ये शिक्षण, रोजगार, वृक्ष व घनकचरा कर आकारण्यात आला. हा कर अवाजवी असून तो रद्द करावा, अशी मागणी नगरसेवक तथा पाणी पुरवठा सभापती शरद यादव यांनी मुख्याधिकाऱ्यांसह नगराध्यक्ष शेख मंजूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

नगर परिषदने गेल्या महिनाभरापासून शहरवासीयांना मालमत्ता कर आकारणीच्या नोटिसा बजावल्या आहेत. अवाजवी कर आकारल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या होत्या. अन्यायकारक कर आकारणीचा नागरिकांना भुर्दंड आहे. शहरातील नागरिकांच्या माथी हा विनाकारण कर लादू नये, अशी मागणी पाणी



पुरवठा सभापती शरद यादव यांनी मंगळवार दि.२३ फेब्रुवारी मुख्याधिकारी, नगराध्यक्ष शेख मंजूर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली.

# अखेर मानव विकास कार्यक्रमाचा झाला विकास

## तब्बल ३९ लाख रूपये संगणक लॅबसाठी होणार खर्च

▶ प्रतिनिधी

वडवणी : वडवणी तालुक्याच्या विकासासाठी पाठपुरावा केल्यानंतर मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत भरीव निधी उपलब्ध झाला असून सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण निर्णय असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

मानव विकास कार्यक्रमा अंतर्गत यापुर्वी फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे व बोगस बिलेपण उचललेली होती. परंतू लोकप्रतिनिधी व वडवणी मराठी पत्रकार संघ, तालुका पत्रकार संघ यांच्या तात्परतेने याला कायमचा आळा बसला आहे. यावरूण लक्षात येते की, अखेर मानव विकास कार्यक्रमा अंतर्गत ई–निविदा काढून वडवणी तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक अशा एकूण २३ शाळांमध्ये (३९ लक्ष रुपये ) जवळपास साडेतीन हजार (३५००) विद्यार्थ्यांना संगणक लॅब स्थापन करण्यासाठी जिल्हा परीषद शिक्षण



विभाग बीड यांस भाग पाडले. तसेच तालुक्यातील शाळांमध्ये ५ लक्ष रुपयांचे मोफत पुस्तके वाटप करण्यात येणार आहेत. ११ लक्ष रुपयांचे विज्ञान साहित्य सुद्धा वाटप होणार आहे यासाठी सुद्धा प्रक्रिया झालेली आहे. यामुळे वडवणी शहरातील व ग्रामिण भागातील ऊसतोड गरीब, होतकरू, कष्टकरी, कामगार यांच्या मुलांना खरा न्याय मिळाला आहे. यासाठी वारंवार चिखलबीड जिल्हा परिषद सदस्य, भाजपा तालुकाध्यक्ष वडवणी, रिपाइं(आठवले गट) तालुकाध्यक्ष वडवणी, मराठी पत्रकार परिषद वडवणी तालुका, वडवणी तालुका पत्रकार संघ यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याबद्दल गोरगरीबांना (सर्वसामान्य) समाधान व्यक्त होत आहे. गटशिक्षण अधिकारी वडवणी यांच्या माहितीनूसार संगणक लॅब मंजूर झालेले गावे व शाळा. जि.प.प्रा. शाळा बाहेगव्हाण, साळींबा, कन्या शाळा वडवणी, पुसरा, हिवरगव्हाण, पिंपरखेड, कवडगाव, खळवट लिंबगाव, हरिश्चंद्र पिंपरी, चिंचोटी, काडीवडगाव, परडी, लवुळ–२, देवगाव, कोठरबन, सोन्ना खोटा, पिंपळटक्का, पिंपळारुई, चिखलबीड, देवळा, खडकी, मोरवड, उपळी–खूर्द या गावांतील शाळांना संगणक लॅब मंजूर करण्यात आलेल्या आहेत.

# मोगरा तांडा दुर्घटनाग्रस्तांना मदतीचा हात

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील मोगरा येथील शिवाजी तांड्यावर झालेल्या गॅस सिलेंडर स्फोटात नुकसान झालेल्या दुर्घटना ग्रस्तांना सभापतीचे पती भगवतराव खुळे यांनी प्रत्येकी दहा हजार रुपयांची आर्थिक मदत देवून या कुटुंबियांना आधार देण्याचे काम केले. दुर्घटनाग्रस्त कुटुंबात समाधान व्यक्त आहे. जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत शेजुळ, संदीप सावंत यांनी देखिल मदत केली आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की, दिनांक २५ फेब्रुवारी रोजी मोगरा गावाजवळील शिवाजी तांड्यावर एका घरामध्ये सिलेंडरचा स्फोट झाला. यामध्ये लाखो रुपयांचे मोठे नुकसान झाले. तसेच त्या घराच्या शेजारील दोन घरामध्येही आर्थिक व संसार उपयोगी वस्तूंचे नुकसान झाले. यामुळे तीन कुटुंब उघड्यावर पडले होते. यांना काही दिलासा मिळावा म्हणून येथील पंचायत



समिती सभापतीचे पती भागवत खुळे यांनी तीन कुटुंबाला १० हजार रुपयांची मदत दिली. या दुर्घटनाग्रस्तांमध्ये अशोक रामा पवार, प्रकाश रामा पवार, विकास पवार या कुटुंबियांचा समावेश आहे. यावेळी जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत शेजुळ, चंद्रजीत वानखेडे, मिलिंद लगाडे, रामचंद्र रोडेवाड, सरपंच आविनाश गोंडे, पप्पू शिंदे, हरी काळे हे उपस्थित होते. या तात्पुरत्या का होईना मदतीमुळे दुर्घटनाग्रस्त कुटुंबाने समाधान व्यक्त केले, मात्र शासनाने लवकरात लवकर या कुटुंबांना भरिव मदत करावी अशी मागणी नागरिक करत आहेत.

### संदिप सावंत कडूनही आर्थिक मदत

या गॅस सिलिंडर स्फोट दुर्घटनेत अशोक पवार यांचे नातेवाईकांचे घर आगीत जळून खाक झाले. मोगरा ग्रामपंचायत सदस्य गोपिका संदिप सावंत यांच्याकडूनही आर्थिक स्वरुपाची मदतीचा धनादेश सुपूर्द दुर्घटनाग्रस्तांना केला. संदीप सावंत, गिन्यानदेव राठोड, उद्धव धुमाळ, अभिमान भोजने, बाबुराव राठोड, गोपीनाथ पवार आदी उपस्थित होते.

## 'नर्मदा अर्बन'चा शुभारंभ



धारूर : किल्लेधारूर येथे 'नर्मदा अर्बन'चा बुधवारी शुभारंभ झाला, त्याबद्दल संस्थापक अध्यक्ष माधव निर्मळ, उपाध्यक्ष कल्याण आबुज यांचा सत्कार करतांना पत्रकार बालासाहेब फपाळ पाटील, गोवर्धन बडे पाटील, वर्तमान माध्यम समुहाचे मुख्य संपादक भगीरथ तोडकरी.

# सावरकरांचा विज्ञानवाद समजून घ्या : डॉ.प्रा.देशमुख

▶ प्रतिनिधी

माजलगाव : श्री सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगाव येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष विभागाच्या वतीने शुक्रवार दि.२६ फेब्रुवारी रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर आत्मर्पण दीन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या सुरवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भालचंद्र कराड यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष विभागाचे समन्वयक प्रा.डॉ.विनायक देशमुख यांनी सावरकर यांच्या जीवनातील प्रमुख घटनांवर भाष्य केले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी मांडलेल्या सती बंदीचा उल्लेख मांडला. तसेच सावरकरांनी अतिशय स्पष्ट शब्दात जातीव्यवस्थेवर हल्ला केला. हिंदू समाजाच्या या अध पतणाला जाती व्यवस्था जबाबदार आसल्याचे मत मांडले. सावरकरांचा विशेष गुण हा की, ते विचार मांडून थांबले नाहीत तर ते विचार आयुष्यात कृतीत आणले. डॉ.विनायक देशमुख यांनी सावरकर यांच्या जीवनातील मृत्यु पत्राचा उल्लेख केला. त्यांनी आंतरजातीय विवाहाला समर्थनच दिले नाही तर आंतरजातीय विवाह लावून दिले. स्वा.सावरकरांचे विज्ञान विषयक विचार किती महत्त्वाचे आहेत हे विविध उदाहरणातून सांगितले. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, प्रा.डॉ.केदारनाथ मालु, प्रा.रमेश गटकळ, प्रा.डॉ. शिवशंकर मिटकरी, प्रा.अशोक होके, प्रा.डॉ. गंगाधर उषमवार, प्रा.डॉ.गोरखनाथ फसले, प्रा.डॉ.तात्याराम सोंडगे, प्रा.जिजाराम बागल, अन्य प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## नांदा सौख्य भरे!



माजलगाव : येथील दिवंगत सुर्यकांत रामलिंग पारडकर यांची धाकटी कन्या अन्नपुर्णा ही लातूर येथे नितीन श्रीहरी गुजर यांच्याशी विवाहबध्द झाली. नवदापत्यांना शुभेच्छा आणि आशिर्वाद देण्यासाठी आप्तस्वकीय, नातलग, मित्र परिवार आणि प्रतिष्ठीत नागरिक उपस्थित होते. या विवाह शासनाने आखून दिलेले कोरोनाचे सर्व नियम पाळून पार पडला.

## सूत्रसंचालकांचा गौरव



प्रसिद्ध सूत्रसंचालक तथा प्रा.रमेश गटकळ यांचा तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटमध्ये गौरव करताना संस्थापक तथा वर्तमान माध्यम समुहाचे सल्लागार चंद्रकांत शेजुळ समवेत मुख्य संपादक भगीरथ तोडकरी, वैजनाथ जाधव.






आधुनिक विचारांचे वर्तमान

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय,23, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022, **सल्लागार संपादक : चंद्रकांत शेजुळ**